# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. ५३३ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०२/०१०/२०१८

## 'हेल्मेट सक्ती– पोलीस कर्मचा–यांवर दंडात्मक कारवाई'

मोटार वाहन अपघातातील होणारे मृत्यु टाळण्यासाठी हेल्मेटचा वापर प्रभावीपणे राबविण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त झालेले आहेत.

तथापि, सामान्य जनतेवर कारवाई करण्यापुर्वी ज्यांचे कडून याबाबतची कारवाई करण्यात येणार आहे. त्या पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचा–यांकडुन आदेशांचे पालन होणे आवश्यक आहे म्हणूनच भंडारा जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना हेल्मेट खरेदी व वापराकरीता एक महिन्याची मुदत देवुन अधिकारी, कर्मचा–यांकरीता बाजाराभावापेक्षा अतिशय स्वत: दरामध्ये पोलीस अधिकारी, कर्मचा–यांकरीता ISI दर्जाचे हेल्मेट पोलीस कॅन्टीनमध्ये विक्रीस उपलब्ध करुन देण्यात आले होते. याबाबतची मुदत दिनांक ३०/९/२०१८ रोजी संपली त्यानुसार पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर यांचे मार्गदशनाखाली दिनांक ०१/१०/२०१८ पासून मोटार सायकल चालविताना हेल्मेटचा वापर न करणा–या पोलीस अधिकारी व कर्मचा–यांवर उपअधिक्षक (गृह) श्री. बनसोडे व वाहतुक पोलीस निरीक्षक गाडे व स्टाफ यांनी स्वत: एकूण ६ कायदेशिर कारवाई करुन रुपये ३०००/– दंड वसूल केलेला आहे. हि कार्यवाही यापुढेहि सतत सुरु राहणार असुन त्यामधे अन्य विभागातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांचेवर सुध्दा हेल्मेट न वापरल्याबददल दंडात्मक कार्यवाही करण्यात येवुन काही दिवसांनी जिल्हयातील सर्व सामान्य जनतेवर सुध्दा दुचाकी चालवितांना हेल्मेट सक्ती करण्यात येणार असुन हेल्मेट परीधान न करता दुचाकी चालविणा–या लोकांवर कार्यवाही करण्यात येणार आहे. पोलीस मुख्यालय, भंडारा येथील पोलीस कॅन्टीन मध्ये नागरिकां करीता बाजारभावापेक्षा स्वस्त दरामधे ISI दर्जाचे हेल्मेट उपलब्ध करुन देण्याबाबत विचार सुरु आहे.

**पोलीस अधीक्षकांकडुन जनतेला आवाहन**

जिल्हयात वाढत्या अपघाताचे प्रमाण व दुचाकीस्वारांनी हेल्मेट न वापरल्यामुळे डोक्याला ईजा होवुन मृत्युचे प्रमाण वाढलेले असुन त्यावर आळा बसविण्याकरीता प्रत्येक दुचाकीस्वारांनी दुचाकी चालवितांना हेल्मेट परीधान करणे गरजेचे असुन नागरीकांनी घराबाहेर दुचाकी घेवुन निघतांना ISI दर्जाचे हेल्मेट परीधान करुनच प्रवास करावा जेणेकरुन त्यांचे कुटुंबिय काळजीत राहणार नाही.

2110

(बि.डी. बनसोडे)
प्रभारी पोलीस उप अधिक्षक (गृह)
भंडारा
संपर्क क्र. ९६६४००२२६४

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता